पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
☏ : ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०
परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation

जावक क्र. : पुअहोसोवि/परमूमं/ 630
Ref. No. : PAHSU/BOEE/

दिनांक :
Date : 14 JUN 2021

## परिपत्रक क्रमांक (29)

प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य / प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील संकुलाचे संचालक यांना कळविणेत येते की, कोविड १९ च्या वाढत्या प्रार्दुभावामुळे अध्ययन, अध्यापनाचे आणि पर्यायाने परीक्षेचे वेळापत्रक बदलून गेले आहे. तरी पण आपल्या विद्यापीठाने मा. कुलगुरु डॉ.मृणालिनी फडणवीस मॅडम, प्र.कुलगुरु प्रो डॉ. देबेंद्रनाथ मिश्रा कुलसचिव डॉ विकास घुटे सर यांच्या मार्गदर्शनाने व आपल्या सर्वांच्या सहकार्याने विद्यापीठाच्या परीक्षा ऑनलाईन घेऊन विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही याची काळजी घेतलेली आहे. आत्तापर्यंत ऑनलाईन घेतलेल्या परीक्षेमध्ये आपले देखील खूप मोलाचे सहकार्य मिळाले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ च्या ऑक्टोबर/नोव्हेंबरच्या सर्व परीक्षा सुरळीत पार पडल्या आहेत. माहे, एप्रिल /मे २०२०-२१ च्या परीक्षा जुलै/ऑगस्ट,२०२१ पासून सुरु होत आहेत. मात्र प्रथम सत्राच्या व व्दितीय सत्राच्या परीक्षा मे २०२१ मध्ये घेतलेल्या आहेत. त्यामुळे त्याच्या एप्रिल/मे,२०२१ च्या परीक्षा घेण्याचे नियोजन करण्यासाठी आपल्या व प्राध्यापकांच्या सहकार्याची अपेक्षा आहे.

पदवी व पदव्युत्तर वर्गाच्या व्दितीय सेमिस्टर व प्रथम सेमिस्टरच्या बॅकलॉकच्या परीक्षा या १० ऑगस्ट,२०२१ पर्यत पुर्ण केल्यास १ सप्टेंबर २०२१ पासून आपण शैक्षणिक वर्ष २०२१-२२ व्यवस्थितरित्या सुरु करता येईल. तरी आपण आपल्या सहका-यांच्या माध्यमातून सुट्टीच्या दिवशी ऑनलाईन जादा तास घेऊन विदयार्थ्यांचा अभ्यासक्रम १० ऑगस्ट पर्यंत पुर्ण केल्यास दोन व एक सेमिस्टरच्या परीक्षा वेळेत व व्यवस्थित रित्या पुर्ण करता येतील. अन्यथा पुढे परीक्षा घेण्यामध्ये अनेक अडचणी निर्माण होतील.

तरी आपण आजपर्यंत जसे सहकार्य करुन परीक्षेच्या कामामध्ये मदत केलीतसे सहकार्य अभ्यासक्रम लवकरात लवकर पुर्ण करुन तशा पध्दतीचा अभिप्राय विद्यापीठास देऊन परीक्षेच्या कामामध्ये सहकार्य करावे , अशी आपणास विनंती आहे.

( डॉ. विकास कदम )
प्र संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति,

१) प्राचार्य, प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये / विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलाचे संचालक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
२) प्रस्तुत विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन विभागातील संगणक विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.